# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १२९/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. रकमाजी अर्जुन हाके,<br>मु.पो. बाज, ता.जत, जि. सांगली.<br>तर्फे प्रतिनिधी श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे,<br>सह–सचिव, जत तालुका विद्युतधारक असोसिएशन,<br>जत, ता. जत, जिल्हा–सांगली. | अपेलंट |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.<br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु ग्रामीण विभाग, विश्रामबाग, सांगली<br>३) सहाय्यक अभियंता (प्रभारी),<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभाग, जत, जि. सांगली.<br>४) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभाग संख, ता.जत, जि. सांगली. | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) श्री. बी.डी. नाईकवाडी, सदस्य–सचिव

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. रकमाजी अर्जुन हाके, मु.पो. बाज, ता.जत, जि. सांगली यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल, सांगली येथे विहीत नमुन्यात अर्ज करून त्यांच्या शेती पंपास सन १९९८ पासून आजपर्यंत वीज कनेक्शन मिळाले नसल्याबाबत तक्रार दाखल केली होती. त्याबाबत कक्षाने दिलेला निर्णय मान्य न झाल्याने तक्रारदाराने प्रस्तुतचे अपील दि. ९–७–२००७ रोजी मंचामध्ये दाखल केले आहे.

अपीलदाराच्या तक्रारीचे स्वरूप खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते –

श्री. हाके, रा बाज, तालुका जत यांनी आपल्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठही विप. यांचेकडे दि. १४–१०–१९९८ रोजी अर्ज करून कोटेशन प्रमाणे डिपॉझीट रक्कमही भरली आहे. तसेच याकामी आवश्यक असलेला चाचणी अहवालही सादर केला आहे. तथापि त्यांच्या शेती पंपास अद्यापही वीज कनेक्शन मिळालेले नाही.

प्रकरणी सुनावणीची तारीख दि. १०–८–२००७ रोजी सांगली येथील महावितरणकर्यालयांत नेमली होती. ती पुढे ढकलून दि. १६–८–२००७ रोजी कोल्हापूर येथे मंचाचे कार्यालयात नेमली होती. त्या दरम्यान ग्राहकाचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी धार्मीक कार्यामुळे सुनावणीचेवेळी उपस्थित रहातां येत नसल्याचे मंचास कळविले. त्यानुसार सदरचे दिवशी ग्राहक श्री. हाके तसेच त्यांचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित नव्हते वि.प. यांचे वतीने श्री जेधे, कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफीसर, मंडल कार्यालय, सांगली व श्री. डी. के. पाटील, कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली हे उपस्थित होते. सुनावणीचेवेळी श्री. पाटील यांनी असे सांगितले की अपीलदार श्री. हाके यांनी शेती पंपास तीन अश्वशक्ति विद्युत भार मिळण्यासाठी वि.प. कडे अर्ज केला होता. तसेच त्यांनी डिपॉझीट रक्कमही दि. १४–१०–१९९८ रोजी वि.प. कडे भरणा केली आहे. या ग्राहकास वीज कनेक्शन देण्यासाठी वि.प.स ०.४२ कि.मी. एवढी लघूदाब विद्युत वाहिनी उभारण्याची आवश्यकता आहे. ग्राहकाने या कामी आवश्यक असलेला चाचणी अहवाल उपविभाग जत यांचेकडे सादर केलेला नाही. तक्रारदाराचे म्हणण्याप्रमाणे जर सदरचा चांचणी अहवाल उपविभाग जत यांनी नाकारला असेल तर त्यांनी सांगली येथील विभागीय कार्यालयांत तो चांचणी अहवाल पोष्टाने पाठविण्यास कसलीही हरकत नव्हती. तसे झाले असते तर वि.प. यांना प्रकरणी पुढील कार्यवाही करणे शक्य झाले असते. श्री. पाटील यांनी पुढे असे सांगितले की याकामी आवश्यक असलेले जादा रोहित्र उभारणीचे काम पूर्ण करण्यांत आले आहे. मात्र अपीलदाराच्या वीज पुरवठा करण्याच्या ठिकाणास भेट देऊन प्रत्यक्ष पहाणी केली असतां त्या ठिकाणी तक्रारदाराने मोटार, वितरण पेटी, कपॅसिटर, मेन स्वीच इत्यादी बसविल्याचे दिसून आले नाही. तसा पंचनामा दि. ३०–७–२००७ रोजी करण्यांत येऊन त्यावर श्री. हाके यांची स्वाक्षरी घेतली आहे. अपीलदार यांनी वरील बाबीची पूर्तता करून चांचणी अहवाल सादर केल्याचे वेळेपासून तीन महिन्याचे मुदतींत त्यांचे शेती पंपास वीज पुरवठा करण्यांत येईल असे शेवटी श्री. पाटील यांनी सांगितले. त्यास अनुसरून तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत वितरण परवानेधारकाच्या कृतीचे मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण ) विनियम २००५ च्या तरतूदी विचारांत घेऊन मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. श्री. हाके यांनी वरील प्रमाणे पूर्तता केल्यानंतर ३ महिन्याचे मुदतीत त्यांच्या शेती पंपास वि.प.ने विद्युत पुरवठा करण्याचा आहे.

२. या आदेशाची अंमलबजावणी करून तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतूदीनुसार वि.प.ने मंचास दि. ३०–११–२००७ पर्यंत कळवावे.

| | | |
|---|---|---|
| ( बी. डी. नाईकवाडी ) | ( जी. सी. लेले ) | ( के. व्ही. पाटील ) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |